# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

सोमवार दिनांक ६ डिसेंबर २०२१रोजी महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून भारतीय विद्या भवनचे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात सर्व कर्मचारी च्या वतीने व भारतीय कामगार सेना सरदार पटेल युनिटच्यावतीने महाविद्यालयाच्या सेंटर लायब्ररीमध्ये आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला हार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात





आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्री.लुईस डायस ह्यांनी प्रस्तावनेत आजच्या दिनाचे महत्त्व उपस्थित सर्व कर्मचारी वर्गाला पटवून दिले. तद नंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोहन मुरडी सर यांनी डॉ.बाबासाहेबांप्रती आपले विचार प्रकट करून प्रतिमेला हार अर्पण केला व मेणबत्त्या प्रज्वलित केल्या नंतर प्राध्यापक डॉ. प्रशांत नगराळे सरांनी आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर त्यांचे विचार प्रकट केले .शेवटी सगळ्यांनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्प वाहून श्रद्धांजलीपूर्वक आदर व्यक्त केला.



धन्यवाद!





